मैत्रीचे महत्व

जेन ॲडम्सची गोष्ट



लेखिका: ॲन डोनेगन जॉनसन
मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक

मैत्रीचे महत्व

जेन ॲडम्सची गोष्ट



लेखिका: ॲन डोनेगन जॉनसन
मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक



ही गोष्ट अशा व्यक्तीबद्दल आहे जिची खूप जणांशी मैत्री होती. ही गोष्ट जेन ॲडम्सच्या जीवनावर आधारित आहे. आणखी काही महत्वाचे तपशील शेवटच्या पानावर दिले आहेत.

खूप वर्षांपूर्वी जेन ॲडम्स नावाची एक छोटी मुलगी अमेरिकेतील इलिनॉय राज्यातल्या सीडरविल शहरामध्ये एका मोठ्या टुमदार बंगल्यात राहात होती.

जेनची तब्बेत खूपच कृश होती आणि तिच्या कमरेत बाक होता. त्यामुळे तिची मान एका बाजूला थोडी वाकडी राहायची. आरश्यात स्वतःला पाहताना तिला थोडं वाईट वाटायचं.

“मी दिसायला चांगली का नाही.” ती स्वतःशी पुटपुटे.



जेनच्या लहानपणीच तिची आई देवाघरी गेली. तिच्या मोठ्या भावंडानी तिला खूप प्रेमाने वाढवलं होतं. जेन दिसायला सुंदर नाही असं त्यांना कधीच वाटलं नाही पण ती तब्बेतीने खूप बारीक आहे असं मात्र त्यांचं ठाम मत होतं.

“जेन, चल बघू. पटापट नाश्ता करून घे. काहीही वाया घालवायचं नाही आहे.” सकाळी ते जेनला म्हणत.





“जेन, पटापट नाश्ता कर. मी आज काही कामासाठी फ्रीपोर्टला जाणार आहे. तू पट्कन खाणं संपवलंस तर माझ्यासोबत येऊ शकतेस.” बाबा म्हणाले.

बाबा जेनचे खूप लाडके होते. त्यांच्याबरोबर फिरायला तिला अतिशय आवडे. तिने भराभर नाश्ता आणि दुध संपवलं. मि. ॲडम्सनी घोडागाडी काढली आणि ते फ्रीपोर्टला जायला निघाले. सीडरविलपासून काही अंतरावर फ्रीपोर्ट हे एक छोटसं शहर होतं.

जेनचे बाबा एक श्रीमंत कारखानदार होते. तसेच त्यांची वित्तीय संस्था होती आणि ते राज्यसभा सदस्यही होते. कामानिमित्त सीडरविलच्या जवळपासच्या शहरांमध्ये त्यांना अनेकवेळा जायला लागायचं. जेनही त्यांच्यासोबत अनेकदा फ्रीपोर्टला गेली होती.


मिस्टर ॲडम्स नेहमी शहराच्या मध्यवस्तीतून जायचे. पण आज मात्र त्यांनी गाडी शहराच्या आतल्या गल्लीमध्ये वळवली.

“ह्या वाटेने तर आपण पूर्वी कधीच गेलो नव्हतो,” जेन म्हणाली. रस्त्याच्या कडेला असलेल्या पडक्या घरांकडे ती पहात होती. त्या घरासमोरच्या छोट्याश्या अंगणात गवत माजलं होतं. घरांच्या खिडक्यांना जीर्ण पडदे लोंबकळत होते. फाटक्या कपड्यांमधली मुलं घोडागाडीला पाहून बाजूला पळाली.

“बाबा, हे काय आहे?“ जेनने आश्चर्याने विचारलं. “इथे इतकी घाण का आहे?”

“हे खूपच गरीब लोक आहेत,” मिस्टर ॲडम्स म्हणाले, “चांगली घरं आणि कपडे त्यांना परवडत नाही."

जेनने एक क्षण विचार केला आणि हसून ती म्हणाली, “मी मोठी झाले की ह्या घरांजवळ आपण राहतो तसं एक मोठं शानदार घर बांधेन. म्हणजे मग ह्या सगळ्या मुलांना माझ्या घराच्या अंगणात खेळता येईल आणि ते माझे दोस्त होतील.”



त्यादिवशी घरी परतल्यावर जेन आपल्या खोलीत आली. तिची लाडकी बाहुली तिकडेच होती. ती बाहुली काचेच्या डोळ्यांनी जेनकडे एकटक पाहत होती.

"मार्जोरी, विचार कर," जेन बाहुलीला म्हणाली. “फ्रीपोर्टमध्ये अनेक मुलं आहेत ज्यांची देखभाल करणारं कुणीच नाही आहे. ती छोटी छोटी मुलं राहतात त्या ठिकाणी खूप घाण आहे आणि ते जुने-फाटके कपडे घालतात.”

हे बोलल्यावर तिला असं वाटलं की बाहुलीने मान हलवली आहे आणि ती म्हणतेय की, “चुकीचं बोलते आहेस तू. तुला त्यांची काळजी आहे. हो की नाही?”

जेन एक क्षण चकित झाली. मग मात्र तिला हसू आलं. “बाहुल्या थोडंच बोलतात,” ती म्हणाली. “तू बोलतेस अशी माझी एक खोटी समजूत आहे. पण मार्जोरी, मला त्याने खूप मजा येते. मी मोठी झाले की त्या मुलांशी मैत्री करेन.”

“तर मग मोठी झाल्यावर त्यांना अजिबात विसरू नकोस,” मार्जोरी म्हणाली. “अर्थातच जेव्हा तू मोठी होशील तेव्हा ती मुलंही मोठी होतील. पण अशी मुलं तर नेहमीच असतील ज्यांना तुझ्या मैत्रीची गरज आहे.”

“मी त्यांना कधीच विसरणार नाही,” जेन म्हणाली.

आणि खरंच तिच्या आयुष्यात अनेक बरे-वाईट प्रसंग आले तरी ती त्यांना कधीच विसरली नाही. जेन आठ वर्षाची असताना तिच्या बाबांनी दुसरं लग्न केलं आणि तिची नवी आई सीडरवीलच्या टुमदार घरात राहायला आली.





जेनच्या नव्या आईला दोन मुलगे होते. मोठा हॅरी अठरा वर्षाचा होता त्यामुळे जेनला तो फारच मोठा वाटायचा. पण धाकटा जॉर्ज मात्र तिच्या वयाचाच होता. तो मोकळा, खेळकर स्वभावाचा होता आणि त्याला आपल्या गोष्टी दुसऱ्यांना द्यायला आवडायच्या.

"जेन चल," तो म्हणायचा. "शेतात आपण सुरवंट शोधूयात."

मग जॉर्ज हिरवं पीस खोचलेली आपली टोपी घालायचा आणि शत्रूशी गाठ पडली तर त्यांचा सामना करण्यासाठी खेळण्यातली तलवार घेऊन ते दोघं निघायचे. अर्थात ती तलवार त्यांना कधीच वापरावी लागली नाही कारण कुरणातले सगळे छोटे कीटक त्यांचे मित्र होते.





जॉर्जसोबत जेनला शेतात हुंदडायला इतकं आवडायचं की ती कमरेचं दुखणं, आपली किरकोळ तब्बेत किंवा आपण चांगलं दिसत नाही याचं वाईट वाटणं सगळं काही विसरून जायची. ती जॉर्जच्या मागेमागे सगळीकडे हिंडायची आणि दोघं मिळून छोट्या अळ्या, सुरवंट, लहान बेडूक आणि फुलपाखरं पकडायचे.

"मार्जोरी, मला खूप धमाल येतेय," घरी परत आली की जेन आपल्या बाहुलीला सांगायची. "जॉर्ज अगदी कमालीचा मित्र आहे."

"अगदी खरंय," मार्जोरी हसत म्हणाली. "चांगला मित्र मिळणं ही खूप भाग्याची गोष्ट आहे."



संध्याकाळी जेनची नवी आई सगळ्या मुलांना घेऊन बैठकीच्या खोलीत बसायची. ती गिटार वाजवायची आणि मुलं त्या तालावर गाणी म्हणत.

गिटार वाजवून आई किंवा गाणी गाऊन मुलं दमली की मग आई त्यांना गोष्ट वाचून दाखवायची. त्या गोष्टीवर त्यांची नाटुकली बसवायला मदत करायची. कधीकधी ती मुलांच्या मित्रमंडळीसाठी पार्टी ठेवायची.

ॲडम्स कुटुंबियातील मुलांनी इतकी मजा पूर्वी कधीच केली नव्हती.

पण पार्ट्या आणि खेळ म्हणजे काही जेनचं आयुष्य नव्हतं. तिला शाळेतही जावं लागे. कधीकधी जेन एकटीच मार्जोरीला मांडीवर घेऊन बाबांच्या वाचनालयातील पुस्तकं वाचत बसे.

“माझं छोटं बाळ इतकी मोठी पुस्तकं वाचायला लागलं!” एक दिवस बाबा तिला कौतुकाने म्हणाले, “तुला पुस्तक वाचताना पाहून मला खूप आनंद झाला आहे. पुस्तक पूर्ण वाचून झालं की मी तुला प्रत्येक पुस्तकामागे पाच सेंट देईन.”

“व्वा, बाबानी चांगला सौदा केला आहे,” मार्जोरी उत्साहाने म्हणाली. “तू तर अशीही वाचनवेडी आहेस त्यामुळे तुझी चांगलीच कमाई होईल.”

जेनने एकमागून एक अशा भरपूर पुस्तकांचा फडशा पाडला आणि बाबांकडून बक्कळ पैसे गोळा केले. तिने वाचनालयातली सगळी पुस्तकं वाचली आणि विशेष म्हणजे तिला वाचलेलं सगळं लक्षात राहायचं. पुस्तकांमुळे तिला खूप नवीन माहिती मिळाली.





जेन आता चांगलीच उंच आणि मोठी झाली होती. पूर्वीसारखी ती आता अशक्त राहिली नव्हती. तिचा मेंदू तल्लख होता. ती इतकी बुद्धिमान होती की प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन तिला नॉर्थम्पटन मॅसॅच्युसेट्समधल्या स्मिथ कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला होता.

“मला खूप आनंद झाला आहे," जेन बाबांना म्हणाली.

“अर्थातच खूप आनंदाची गोष्ट आहे ही,” बाबा सहमतीने म्हणाले. “मला तुझा खूप अभिमान वाटतो आहे. कारण सगळी मुलं काही स्मिथ कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल इतकी तुझ्यासारखी हुशार नसतात. जेन, मी रॉकफोर्ड फिमेल सेमिनरीच्या नियामक मंडळावर आहे. तू तिथे गेली नाहीस तर लोक मला नावं ठेवतील. मला तिथे राजीनामा द्यावा लागेल.”

आपल्या बाबांना दु:ख होईल किंवा शरमेचं वाटेल असं काहीही करायची जेनची इच्छा नव्हती. त्यामुळे स्मिथ कॉलेजमध्ये शिकण्याचं स्वप्न सोडून तिने आपलं सामान घेतलं आणि रॉकफोर्ड कॉलेजला आली.

“हे इतकंही वाईट नाही,” सेमिनरीला आल्यावर तिला वाटलं. ती आपल्या खोलीत आली आणि मार्जोरीबरोबर लहान असताना जशी खोटं खोटं गप्पा मारायची तशीच आताही बोलू लागली. कधी उदास वाटलं किंवा अडचण आली की मार्जोरीबरोबर बोलल्यावर तिला बरं वाटायचं. “रॉकफ़ोर्डमध्ये पदवी मिळायची सोय असती तर किती बरं झालं असतं,” ती म्हणाली.

मार्जोरीने खोलीत नजर टाकली आणि म्हणाली, “किती आरामशीर खोली आहे! गालिचा सुंदर आहे आणि शेकोटी पेटवायला लाकडंही भरपूर आहेत. आणि इथे कोर्स पूर्ण झाला की पदवीसाठी तुला नक्की प्रयत्न करता येईल.”

सेमिनरीमध्ये जेनच्या वर्गात खूप मुली होत्या. लवकरच एलेन गेट्स स्टार तिची अगदी जिवलग मैत्रीण झाली. दोघी भरपूर गप्पा मारायच्या, आपली गुपितं एकमेकींना सांगायच्या, भविष्यामध्ये काय करायचं आहे ह्यावर तासनतास बोलायच्या.

“बऱ्याच मुलींना दुसऱ्या देशात जाऊन धर्मप्रसाराचं काम करायचं असतं,” जेन एलेनला म्हणाली. “परंतु इथल्या गरीब लोकांचा मात्र कुणीही विचार करीत नाही.”

एलेनने मान डोलावली. “असं वाटतं की गरीब लोकांशी मैत्री करायला कुणालाच आवडत नाही. हो नं?”

जेनच्या चेहऱ्यावर एक दृढ निश्चय केल्याचे भाव आले. तिला फ्रीपोर्टमधल्या अस्वच्छ घरांची आणि फाटके तुटके कपडे घातलेल्या मुलांची आठवण आली. "एक न एक दिवस मी हे सगळं बदलून टाकीन,” जेन म्हणाली.



जेनने नेटाने अभ्यास केला. इतर मुलींना अवघड जातात असे गणित व विज्ञानाचे कोर्स तिने उत्तम ग्रेडने पूर्ण केले. तिने तीन वर्षाचा सेमिनरीतील कोर्स पूर्ण केला तेव्हा तिला अजून एक वर्ष सेमिनरीमध्ये राहून ॲडव्हान्स कोर्स करण्याची परवानगी मिळाली. तिने हा कोर्स पूर्ण केला आणि कॉलेजच्या पदवीसाठी पात्र ठरली.

“जेन, शाब्बास!,” मार्जोरीच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. “मला पूर्ण खात्री होती की जिद्द व मेहनत ह्या गुणांवर तू काहीही करू शकतेस.”



“आता मी डॉक्टर होण्यासाठीचे शिक्षण घेऊ शकते.” जेन म्हणाली. “म्हणजे गरीब लोकांची मला सेवा करता येईल.”

तिने फिलाडेल्फियातील विमेन्स मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा ह्यासाठी पत्र पाठवले. रॉकफोर्डच्या चमकदार कामगिरीच्या आधारावर तिचा अर्ज लगेचच स्वीकारला गेला आणि तिचा प्रवेश निश्चित झाला. पानगळीच्या मोसमात कॉलेज सुरु होणार होतं.

परंतु एक अतिशय दु:खदायक घटना घडली.

ऑगस्टमध्ये जेन मेडिकल कॉलेजला जाण्याची तयारी करत होती तेव्हाच तिचे बाबा, जॉन ॲडम्सचा मृत्यू झाला.





जेन कोलमडून गेली. “मार्जोरी, आता मी काय करू?” ती हुंदका देत म्हणाली. “माझे लाडके, प्रिय बाबा! तुम्ही माझे सगळ्यात जवळचे मित्र होतात. मला तुमची खूप आठवण येते आहे.”

“मी समजू शकते, जेन,” मार्जोरी म्हणाली. “जेव्हा आपला मित्र जातो तेव्हा खूप एकटं वाटतं.”

मार्जोरी जेनला हे मात्र म्हणाली नाही की काळ उलटला की दुसरे मित्र मिळतात जे आपलं एकटेपण घालवतात. जेनला हे स्वतःलाच कळेल एक दिवस.



"जेन, हे असं किती दिवस चालणार," मार्जोरीने तिला जागं केलं. “कुणाचीतरी मदत घेणं आवश्यक आहे. तू भावाकडे का जात नाहीस.”

जेनच सावत्र भाऊ हॅरी हाडेलमन आता एक निष्णात डॉक्टर झाला होता. जेनची बहीण एलिसशी त्याचा विवाह झाला होता आणि आता ते आयोवाला राहत होते.

“हो, त्याच्याकडे जावं असं मलाही वाटतंय,” जेन म्हणाली. “काही काम करता येत नाही, उठता बसता येत नाही, मला काहीच सुचत नाही आहे. आता काहीतरी करायलाच हवं.”

सप्टेंबर महिन्यात जेन फिलाडेल्फियातील कॉलेजमध्ये दाखल झाली. मेडिकलच्या अभ्यासामध्ये ती पूर्ण गुंतून गेली. अजूनही दु:खातून ती पूर्ण सावरली नव्हती पण अभ्यासामुळे तिला आता इतर कुठे लक्ष द्यायला वेळ नव्हता.

आणि अचानक एक मोठं संकट उभं ठाकलं ज्याकडे तिला लक्ष द्यावंच लागलं.
जेनच्या पाठीचं दुखणं पुन्हा सुरु झालं. तिला पाठीतून इतक्या तीव्र वेदना येत की तिला उठून बसताही येतं नव्हतं. त्यामुळे तिला काही दिवस अजिबात अभ्यास करता आला नाही.



“जेन, ऑपरेशन करावं लागेल,” हॅरी तिला तपासल्यावर म्हणाला. “तुझ्या आजारावर मी इलाज करू शकतो पण पूर्ण बरं व्हायला खूप काळ लागेल.”

जेनने ऑपरेशनसाठी होकार दिला. त्याशिवाय दुसरा पर्यायही नव्हता कारण दुसऱ्यांना मदत करण्यासाठी आधी होती तशी तब्बेत तिला हवी होती.

ऑपरेशन झाल्यानंतर सहा महिने उलटले तरी जेन पूर्ण बरी झाली नाही. तिला कमरेला अजूनही वजनी पट्टा बांधावा लागत होता.





“जेन, तू यूरोपमध्ये फिरायला जातेस का?" हॅरीने सुचवलं. तुझ्यासाठी खूप छान अनुभव असेल. आणि तुझी तब्बेत सुधारायलाही वेळ मिळेल. अर्थातच तू एकटीने जायचं नाही आहे. आई तुझाबरोबर असेल. आवडेल न तुला?”

तिला ही कल्पना फारच आवडली. तिने लगेचच आनंदाने होकार दिला. “हॅरी माझा फक्त भाऊच नाही तर चांगला मित्रही आहे. आणि आईही माझ्याशी मैत्रिणीसारखी वागते. इतकी चांगली माणसं मला मिळाली, खरंच मी किती भाग्यवान आहे.”, जेन खुश होऊन म्हणाली.


अचानक जेनला वाऱ्यावर सोडलेल्या त्या गरीब मुलांची आठवण झाली. “एक न एक दिवस मी नक्की त्यांच्यासाठी काहीतरी करीन,” जेन निश्चयाने म्हणाली.

सामानाची बांधाबांध झाली आणि जेन व आई जहाजाने युरोपच्या प्रवासाला निघाल्या. समृद्राचा ताजा गार वारा खायला जेन “सर्विया” जहाजाच्या वरच्या डेकवर बसली. आपल्या शरीरात एक सळसळता उत्साह आणि वेगळीच उर्जा भरली गेली आहे असं जेनला वाटलं.

त्यांचं जहाज आयर्लंडच्या किनाऱ्याला पोचलं आणि त्यांच्या सहलीला सुरवात झाली. त्यांनी तिकडे “बार्नी स्टोन”ला भेट दिली. जुनी घरं आणि ऐतिहासिक किल्ले पाहिले. तिथून त्या स्कॉटलंडला गेल्या आणि नंतर इंग्लंडला पोचल्या. तिथे त्यांनी सुंदर सरोवरं पाहिली.

आणि शेवटी जेन आईसोबत लंडनला आली.

तिकडे त्यांनी काय काय पाहिलं माहीत आहे का तुम्हाला?



तिथे त्यांनी उंच इमारती, सुंदर कारंजी आणि हिरवीगार उद्यानं पाहिली. तसेच तिथल्या अरुंद आणि बकाल वस्त्या आणि त्यात राहणारे खंगलेले उपाशी पुरुष, अशक्त स्त्रिया आणि अर्धनागडी कुपोषित मुलंही त्यांच्या नजरेस पडली. सडलेल्या आणि कुजलेल्या भाज्यांचा बाजार आणि तो विकत घेणारी गरीब लोकही तिकडे त्यांना पाहायला मिळाली.

अर्थात आता बाहुली घेऊन फिरायला जेन काही छोटी मुलगी राहिली नव्हती. परंतु जेव्हा कधी उदास, चिंता किंवा निराशा दाटून येई तेव्हा जेन मनातल्या मनात मार्जोरीशी संवाद साधी.

सडक्या-कुजक्या भाज्यांचा बाजार पाहून ती मार्जोरीला म्हणाली, “किती भयानक आहे हे! शिल्लक राहिलेल्या एक-दोन रुपयामध्ये हे लोक सडलेला कोबी विकत घेताहेत जो अजिबात खाण्यालायक नाही. मार्जोरी, मला ह्या गरीब लोकांसाठी काहीतरी करायलाच हवं. मी काय करू शकते हे माहीत नाही पण ह्यांना अशा परिस्थितीत मी राहू नाही देणार एवढं नक्की.”



जेन जवळपास दोन वर्षं युरोपमध्ये राहिली. ती अनेक देश फिरली आणि सगळीकडे मदतीची आणि मैत्रीची गरज असलेली लोकं पाहिली.

घरी परतल्यावर तिने आपली जिवलग मैत्रीण एलेन स्टारला पत्रात लिहिलं. “मी हरले आहे असं वाटतंय.” ती एलेनला म्हणाली. “गेली अनेक वर्षं ह्या गरजू गरीब लोकांविषयी मी विचार करते आहे. पण त्यांच्यासाठी मी अजून काहीही कृतीत आणू शकले नाही.”





मग तिला अचानक लंडनमध्ये पाहिलेली ती जागा आठवली. लंडनच्या झोपड़पट्टीमधली टॉय अँड बी नावाची इमारत. शिकलेल्या काही लोकांचा गट तिकडे गरीब लोकांना शिकवण्याचं काम करीत असे. त्या जागेला "सेटलमेंट हाउस" म्हणत. लहानपणापासून जेनने ज्या काल्पनिक घराचं स्वप्न पाहिलं होतं ते त्याच्याशी अगदी मिळतंजुळतं होतं. बकाल वस्तीमधली ती एक सुंदर जागा होती. ती एक अशी जागा होती जिकडे गरीब लोक आपला वेळ आनंदात घालवू शकत. जिथे नवीन मित्र भेटत.

“तू पुन्हा युरोपला का नाही जात?” मार्जोरी पुटपुटत म्हणाली. ”तिथे अशा अनेक जागांना तुला भेट देता येईल. आणि गरिबांसाठी नक्की काय करता येईल ह्याची स्पष्टता तुला मिळेल.”

आणि जेन पुन्हा एकदा युरोपच्या प्रवासाला निघाली. ह्यावेळी एलेन तिच्याबरोबर होती.




जेन आणि एलेन अमेरिकेत परत आल्या. ह्यावेळी जेनचा निश्चय पक्का झाला. झोपड़पट्टीच्या मधोमध एक मोठं सुंदर घर बांधायचं, आजूबाजूच्या लोकांना तिकडे बोलवायचं आणि आपल्या शिक्षणाचे आणि प्रवासाचे अनुभव त्यांना सांगायचे.

“असं घर मला शिकागोमध्ये बांधायचं आहे” ती म्हणाली. “आणि तुला माहित आहे का एलेन, युरोपमधली झोपडीत राहणारी गरीब लोक निदान एकमेकांच्या घरी तरी जाऊ शकतात पण इथे शिकागोमध्ये पोलंड, इटली, जर्मनी, रशिया आणि अशा अनेक देशातून आलेले स्थलांतरित लोक राहतात. त्यांना किती एकटं वाटत असेल, नाही!”

जेन आणि एलेन ह्या कामासाठी योग्य अशी जागा शोधायला शिकागोला निघाल्या. “मोठं आणि सुंदर घर आपल्याला हवं,” जेन म्हणाली. “पडकं आणि अस्वच्छ घर असलं तर कुणी फिरकणार सुद्धा नाही.”

झोपड़पट्टीच्या मधोमध असं सुंदर आणि विशाल घर मिळणं तसं अवघडच होतं. पण जेन आणि एलेन न थकता घर शोधत होत्या. त्यासाठी त्यांनी शेकडो वस्त्या, लांबलांब पसरलेले घाणरडे रस्ते, आणि हजारो मोडक्या जुन्या इमारती पालथ्या घातल्या.

आणि अखेरीस एक महत्वाची घटना घडली.




जेन आणि आर्किटेक्ट एलन पौंड हाल्सटेड स्ट्रीटवरून चालत होत्या. तेवढ्यात जेनचं लक्ष एका मोठ्या दगडी घराकडे गेलं.

“थांबा, मिळालं”, जेन ओरडली. “मला जसं हवं आहे अगदी तसंचं हे घर आहे. थांबा!”

मिस्टर पौंड थांबले आणि पाहू लागले. “हे घर?” ते म्हणाले. “ही हल कुटुंबियांची जुनी हवेली आहे आणि त्याची बऱ्यापैकी पडझड झाली आहे.”

“पण किती सुंदर घर आहे हे,” जेन म्हणाली. “आपण हे दुरुस्त करून घेऊ शकतो. तुम्ही मला हल कुटुंबियाची माहिती सांगाल का? ते हे घर मला भाड्याने देतील का?”



मिस्टर पौंडनी खांदे उडवले. “काही सांगू शकत नाही,” ते म्हणाले. "चार्ल्स हल हे एक धनाढ्य व्यक्ती होते. ३० वर्षांपूर्वी त्यांनी हे घर बांधलं होतं. त्यांच्या मृत्यूपश्चात ह्या घराचा ताबा त्यांची चुलतबहिण मिस हेलेन कल्वर हिच्याकडे आहे. कित्येक वर्षं हे घर असंच रिकामं पडून आहे.

“मिस कल्वरला मला भेटता येऊ शकेल का?” जेनने विचारलं. “ हे घर मला कशासाठी हवं आहे हे मला तिला सांगता येईल.”

जेनला आपल्या जुन्या घरात "सेटलमेंट हाउस" चालू करायचं आहे हे ऐकून मिस कल्वरना खूप आनंद झाला.

"माझ्या भावाने चार्ल्सने हे घर बांधलं तेव्हा हाल्सटेड स्ट्रीट ही अतिशय सुंदर जागा होती.," मिस कल्वर म्हणाल्या. “आता काही ती सुंदर राहिली नाही पण जे आता तिकडे राहत आहेत ते कदाचित चांगले लोक असतील. त्यांना त्यांच्या आयुष्यात थोडी आशा आणि उर्जा हवी असेल.

“तर मग तुम्ही द्याल का ते घर मला भाड्याने?” जेनने विचारले.





“अर्थातच देईन आपण एका अटीवर,” मिस कल्वरनी उत्तर दिलं. “आणि ह्या जागेचं वर्षभराचं भाडं म्हणून मला एक पूर्ण डॉलर हवा,” त्या हसून म्हणाल्या. “माझा भाऊ खूप नशीबवान होता. आपल्या मिळकतीचा काही भाग शिकागो शहरासाठी द्यावा अशी त्याची खूप इच्छा होती. त्याची इच्छा पूर्ण करण्याची ही संधीच ह्या निमित्ताने चालून आली आहे.”

जेन आणि एलेनने मोठ्या आनंदाने भाडं म्हणून एक डॉलर त्यांना दिला. लगेचच त्या जुन्या घराच्या साफसफाई, रंगरंगोटी ह्या कामाला लागल्या. जेनच्या इतर मित्रमंडळीला जेव्हा ह्या कामाबद्दल कळलं तेव्हा तेही तत्परतेने मदतीला हजर झाले.


“ह्या जागेचं नाव काय ठेवणार आहेस, जेन?” एका मित्राने विचारलं.

“ह्याला नाव आहेच की आधीपासून,” जेन म्हणाली. “हल हाऊस.”

ह्या दोन खानदानी स्त्रियांना फरशी साफ करताना, खिडक्या स्वच्छ धुताना, दाराच्या कड्या साफ करताना आजूबाजूच्या बायका आश्चर्याने पाहायच्या.

“नक्की काय चालू आहे इकडे?” त्या आपापसात बोलत. “आणि काहीही झालं तरी ह्या बाया काही इकडे राहायला येणार नाहीत.”





घराची स्वछता आणि रंगरंगोटी पूर्ण झाल्यावर फर्निचर यायला सुरुवात झाली. त्यात जेनच्या सीडरविलच्या घरातून सोफा आणि टेबल-खुर्च्या होत्या. युरोप सहलीमध्ये काढलेल्या देखण्या शहरांच्या आणि गावांच्या फोटोफ्रेम होत्या. चांदीची कपाटं, चिनीमातीची सुंदर भांडी आणि नक्षीदार चादरींचे खोके होते.

“किती सुंदर वस्तू आहेत ह्या,” शेजारच्या बायका बोलू लागल्या. “असं वाटतंय की ह्या महिला इकडेच राहायला येणार बहुधा.”

अर्थातच जेन आणि एलेन लवकरच गाद्या-गिरद्या आणि इतर सामान घेऊन ह्या मोठ्या घरात राहायला आल्या. रात्री त्या दिवाणखान्यातले सगळे दिवे लावायच्या. आणि दिवसा त्या आजूबाजूच्या परिसरात फिरून यायच्या.

जेनने जवळच्या किराणा दुकानामधून सामान खरेदी केलं आणि त्या दुकानाच्या मालकाला सांगून ठेवलं की शेजारपाजारचे लोक तिला भेटायला आले तर तिला खूप आवडेल.

किराणा दुकानात ये-जा करताना ती वाटेत तिथल्या छोट्या मुलांशी गप्पा मारायची आणि त्यांना तिच्या घरी खेळायला यायला आवडेल का हे विचारायची.

मुलं खूप शांत होती पण तिच्याकडे ती संशयाने पाहत.



“इतक्या चांगल्या घरातील महिला ह्या हाल्सटेड स्ट्रीटवर का बरं राहायला आल्या आहेत?” एकाने विचारलं.

“मला तर ह्यात काहीतरी गड़बड़ वाटतेय,“ दुसरा म्हणाला.

“एलेन, त्यांना आपल्याबद्दल विश्वास का वाटत नाही आहे?” जेनने एक दिवस घरी परत येताना विचारलं.

“थोडा वेळ लागेल ह्यासाठी” एलेन म्हणाली. “आपल्यासारख्या लोकांकडून आमंत्रण हे त्यांच्यासाठी अगदीच नवीन आहे. आपल्यायला त्यांच्याशी मैत्री का करायची आहे हे त्यांना समजणं थोडं अवघड आहे.”

एलेनचं बोलणं पूर्ण व्हायच्या आतच कुणीतरी दारावर टकटक केली.





कोण आलं आहे हे पाहायला जेन दाराकडे धावली.

काळे केस असलेली एक बाई दारात उभी होती. तिच्या हातात छोटं बाळ होतं आणि एक चिमुकली तिला बिलगलेली होती.

"किराणा दुकानाच्या मालकाने सांगितलं की तुम्ही कदाचित मला मदत करू शकाल," ती बाई म्हणाली. ती अगदी हळुवार आणि नाजूक आवाजात बोलत होती. तिचे उच्चारही पूर्ण वेगळे होते. ती एक इटालियन स्त्री आहे हे जेनने लगेचच ओळखलं.

“मला नोकरी करणे आवश्यक आहे,” ती स्त्री म्हणाली. “मी जर कामावर गेले नाही तर मला नोकरीवरून काढून टाकतील. माझ्या मुलांना सांभाळणारी माझी मैत्रीण नेमकी आज आजारी आहे. त्यामुळे माझ्या बाळाला आणि छोट्या मुलीला बघणारं दुसरं कुणीच नाही आहे.”

“आम्ही आहोत नं,” जेन म्हणाली. “तू मुलांना आमच्याकडे सोडून कामाला जाऊ शकतेस. त्यांची देखभाल करायला आम्हाला खूप आवडेल. शेवटी आपण शेजारी आहोत. हो की नाही?”

जेनने बाळाला आपल्या कुशीत घेतलं आणि एलेन छोट्या मुलीला दिवाणखान्यात घेऊन गेली.

“काहीही काळजी करू नकोस. अगदी निश्चिंत मनाने कामाला जा,” जेन म्हणाली.

आणि जेन स्वतःशीच म्हणाली, “ही तर सुरुवात आहे.”





खरंच ती सुरुवात होती. लवकरच अजून ५ छोटी मुलं रोज हल हाउसमध्ये येऊ लागली. त्यात दोन इटलियन मुलं होती आणि तीन अजून वेगळी होती.

जेन आता चांगलीच व्यस्त झाली होती. आता तिच्याकडे पूर्वीसारखी मार्जोरीबरोबर गप्पा मारायला उसंत नव्हती. मार्जोरीला त्याबद्दल काही तक्रार नव्हती. जेनला आनंदी बघून मार्जोरीही खुश होती.

एलेनही खुश होती. जेव्हा जेनी डाओ नावाची एक तरुण महिला त्यांना भेटायला आली तेव्हा तिने अभिमानाने तिच्याशी आपल्या नव्या पाच छोट्या दोस्तांशी ओळख करून दिली. “सगळे एकजात मस्तीखोर आहेत,” एलेन कौतुकाने म्हणाली. दिवसभर मला पळायला लावतात.

“हो नं, ते तर पहातेच आहे मी,” जेनी हसून म्हणाली. “तुमची काही हरकत नसेल तर तुमच्या मदतीला मी आलं तर चालेल का?”

जेन आणि एलेनने आनंदाने होकार दिला. जेनी आल्यावर त्यांनी हल हाउस किंडरगार्डन सुरु केलं.

लवकरच अजून काही मित्रमंडळी त्यांच्या मदतीला आले. हल हाउसमध्ये अनेक नवीन उपक्रम सुरु झाले. मोठ्या मुलींसाठी शिवणकाम, नाच आणि स्वयंपाकाचे वर्ग सुरु झाले. मोठे मुलगे उगाच उनाडक्या करत भटकत राहतात ते थांबावं म्हणून त्यांचे खेळ घेऊ लागले. आणि गाणी आणि खेळ तर सर्वांसाठीच होते.

जेनच्या कल्पनेत होतं अगदी तसंच हल हाउस आकाराला येऊ लागलं. लोकांना थोडा आराम मिळण्याचं, एकमेकांना जाणून घेण्याचं, धमाल करण्याचं आणि नवनवीन गोष्टी शिकण्याचं हे ठिकाण बनलं.



हल हाउसच्या स्त्रिया खूप चांगल्या स्वभावाच्या आहेत ही बातमी सगळीकडे पसरली. त्यामुळे आता मोठी माणसं आणि वृध्द लोकही संध्याकाळी येऊ लागले. ते आरामात बसून केक आणि कॉफी पीत बसत. त्यांच्यासाठी एक खास खोली बनवली होती. त्या खोलीत जेनने इटलीहून आणलेल्या घरांच्या फोटोच्या तसबिरी लावल्या होत्या. इटलीहून आलेले लोक ते पाहून आपल्या मूळ घरांच्या आठवणीने कधीकधी व्याकूळ व्हायचे पण तरीही त्यांना ती रूम खूप आवडायची.

लवकरच हल हाउस लोकांच्या गजबजाटाने भरून गेले. दिवसभर छोटी मुलं असायची आणि संध्याकाळी मोठे येत. सगळे हास्यविनोद आणि गप्पा मारत बसत. त्याबरोबरीनेच सगळे अनेक नवीन गोष्टी शिकत होते. एकमेकांना समजून घेत होते.

“जेन, किती करतेस तू ह्या लोकांसाठी”, मार्जोरी म्हणाली.

“त्यांनीही मला भरभरून दिलं आहे.” जेन म्हणाली. “त्यांनी मला आपलं मानलं आहे. आता खऱ्या अर्थाने आम्ही शेजारी आहोत. माझ्यासाठी ते खूप मोलाचं आहे.”





जसजशी हल हाउसची ख्याती वाढू लागली तसतसा धनिकांचा मदतीचा ओघ वाढू लागला. विद्वान लोक त्यांचं कौशल्य आणि अनुभव इथल्या गरीब लोकांना उपयोगी पडावा ह्यासाठी मदत करू लागले.

डिसेंबर महिन्यात गोठवणारी थंडी आणि बोचरे वारे वाहू लागले. इकडे हल हॉउसमध्ये भेटवस्तूंचा ओघ सुरु झाला.


“व्वा! ह्यावर्षीचा ख्रिसमस अगदी खास असणार आहे!” जेन आनंदाने म्हणाली. “बघ नं, केवढे सारे बटाटे, टर्की, सफरचंदाचे ढीग आणि कॅन्डीच्या राशीच्या राशी येऊन पडल्यात. मुलं तर हरखून जातील हे पाहून.”

“हो, मुलं नक्कीच खुश होतील,” एलेन म्हणाली. “पण...पण मुलं आहेत कुठे, जेन? दुपारनंतर मुलं इकडे का बरं फिरकत नाहीत हल्ली. इथले खेळ आणि इतर गोष्टीचा कंटाळा आला आहे का त्यांना?”

“छे छे असं कसं होईल.” जेन म्हणाली. आणि ती शेजारीपाजारी नक्की काय चालू आहे हे पाहण्यासाठी घाईने बाहेर पडली.

तिने गेल्यावर तिला कळलं की ख्रिसमसची सुट्टी सुरु झाल्यामुळे सगळी मुलं जवळच्या कारखान्यामध्ये काम करायला जात होती. हल हाउसमध्ये येण्यासाठी त्यांच्याकडे आता वेळच नव्हता.

“हे खूप वाईट आहे,” जेन म्हणाली. “इतक्या लहान वयात त्यांनी काम करणं किती अयोग्य आहे. पण कदाचित त्यांच्या आई-बाबांना पैशाची अतिशय गरज असल्याने त्यांना ते करावं लागतंय.”



ख्रिसमसच्या दोन दिवस आधी जेनने तिथल्या मुलींसाठी पार्टी आयोजित केली होती. जेनला त्या खूप दमलेल्या वाटल्या. पण त्यांना बऱ्याच दिवसांनी भेटून जेनला खूप आनंद झाला. मुलींनी ख्रिसमसची गाणी म्हटली आणि पार्टी सुरु झाली.

जेनने खूप मेहनत घेऊन जय्यत तयारी केली होती. खाण्यासाठी सँडविच आणि बिस्किटं तसंच हॉट चॉकलेट होतं. आणि अर्थातच भरपूर कॅन्डी ठेवल्या होता. कारण लोकांनीही हल हाउसला भरभरून कॅन्डी पाठवल्या होत्या.

पण मुलींनी त्या कॅन्डीकडे ढुंकूनही पाहिलं नाही. बिस्किटं तसंच हॉट चॉकलेटमधेही त्यांना फारसं स्वारस्य नव्हतं. ते पाहून जेनी डाऊ आणि जेन काळजीत पडल्या.


आणि मग नक्की काय झालं आहे हे एकदाचं जेन, एलेन आणि जेनीला कळलं.



ह्या सगळ्या मुली जवळच्या कॅन्डीच्या कारखान्यामध्ये काम करणाऱ्या. तिथे त्या आठवड्यातले सहा दिवस रोज चौदा तास दाटीवाटीने कोंदट खोलीत बसून कॅन्डी आवरणात गुंडाळायचं काम करायच्या. कॅन्डीचे ढिगारे आणि त्यांचा गोड वास ह्याने त्यांची गोड पदार्थ खाण्याची इच्छा पूर्ण मरून गेली होती.

“बहुधा ह्या आयुष्यभर कॅन्डी तोंडात टाकणार नाही,” मार्जोरी जेनला म्हणाली.

“मलाही तसंच वाटतंय. आठवड्यातले सहा दिवस रोज चौदा तास! बापरे, कसलं भयंकर आहे! कॅन्डी आवरणात गुंडाळणं असो नाहीतर शिवणकाम असो. ह्या वयामध्ये त्यांनी इतकं काम केलं तर त्यांची तब्बेत पार बिघडून जाईल."



जेन आणि तिच्या मित्रांनी मुलींच्या ह्या पिळवणूकीबद्दल वृत्तपत्रामध्ये आणि न्यायसंस्थेला पत्र पाठवायला सुरुवात केली.

“अशा पिळवणूकीविरोधात कायदा झालाच पाहिजे,” जेन म्हणाली. “मुलांचं रक्षण झालंच पाहिजे.”

“कारखान्याच्या मालकांना हे आवडणार नाही,” मार्जोरीने तिला सूचित केलं. “ते तुझ्याशीही भांडायला येतील. तुला कल्पना आहेच की मोठ्या लोकांइतका पगार लहान मुलांना द्यावा लागत नाही.”

आणि तसंच झालं. कारखान्याच्या मालकांना काही हे आवडलं नाही. ते भांडायला आले. परंतु काही दिवसातच हल हाउसच्या प्रयत्नांमुळे बालकामगार कायदा लागू झाला. ह्या कायद्यानुसार १४ वर्षाखालील मुलांना कामाला बंदी तसेच १६ वर्षाखालील मुलांना दिवसाचे जास्तीत जास्त आठ तास काम असे संमत झाले.





जेनला आपण काहीतरी विशेषतः बालकामगार कायद्यासारखं महत्वाचं काम करू शकलो ह्याचा खूप आनंद झाला.

“हे काम तर झालं आता मला रस्त्याच्या कडेला असलेल्या कचरा-घाणीबद्दल काहीतरी करायला हवं,” जेनने ठरवलं. “रस्त्याच्या कडेला किती दुर्गंधी असते आणि तब्बेतीसाठी हे किती अपायकारक आहे! हे स्वच्छता कामगार कामाची फार चालढकल करतात.”


घाणीत काम करायला अर्थातच त्यावेळी कुठल्याही स्त्रिया तयार नव्हत्या. पण तरीही जेनने पुढाकार घेऊन आपल्या भागामध्ये कचरा निरीक्षकाची नोकरी मिळवली.

रोज पहाटे लवकर उठून जेन घराबाहेर पडे. रस्त्याच्या कडेचा कचरा उचलणाऱ्या कचरागाड्यांच्या मागेमागे जाऊन ते सगळे रस्ते नीट स्वच्छ करतात की नाही ह्यावर बारकाईने देखरेख ठेवी.

“अहो, दादा," ती एका माणसावर ओरडली. “तुमची गाडी इतकी जास्त भरली गेली आहे की हा कचरा डेपोमध्ये नेतानाच अर्धा कचरा रस्त्यावर पडेल.”

“बाईच्या जातीनं कचरा निरीक्षक होणं योग्य नाही,” तो माणूस जेनला बडबडला.

जेनने त्याच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं आणि नगरपालिकेने जास्तीच्या कचरागाड्या पाठवाव्यात म्हणून आग्रह धरला. लवकरच तिथल्या वस्तीमध्ये सुधारणा झाली. रस्ते आता स्वच्छ आणि नीटनेटके दिसू लागले आणि दुर्गंधीही बरीच कमी झाली.



जेनने आपला संघर्ष चालूच ठेवला. तिने गरिबांना आपले मित्र मानलं होतं. त्यांच्या भल्यासाठी ती आयुष्यभर झटली.


जेनच्या प्रयत्नामुळेच शिकागोमध्ये पहिलं खेळाचं मैदान झालं. तिच्यामुळेच शहरात अनेक शाळा सुरु आल्या. महिलांना मतदानाचा हक्क मिळण्यामध्येही तिचा वाटा आहे.

जेन काळाच्या पुढचा विचार करायची. तिच्या धडपडीमुळे शहरातील मुलांसाठी गावामध्ये कॅम्प उभारले गेले. त्यामुळे सुट्टीमध्ये त्या मुलांना मोकळ्या शेतात राहण्याची व जंगलामध्ये भटकंती करण्याची मजा अनुभवता यायला लागली.

जेनची प्रसिद्धी वाढू लागली. तिच्या कामातून प्रेरणा घेऊन काही लोकांनी दुसऱ्या शहरांमध्ये गरीब वस्त्यांमध्ये सेटलमेंट हाउस बांधली. सिनेटर, पंतप्रधान, राजपुत्र अशी मोठ-मोठी माणसं हल हाउसला भेट देऊ लागले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षही एकदा भेट देऊन गेले.



इतक्या प्रसिध्द आणि ख्यातनाम व्यक्तींनी भेट देणं, कामाची दखल घेणं, प्रशंसा करणं अर्थातच जेनला आवडतं होतं. पण तिला खरा आनंद सभोवतालच्या गरिबांच्या मैत्रीतून मिळत होता. आणि त्यांनीही तिला तेवढंच आपलं मानलं होतं.



तुमच्या शहरात कदाचित हल हाउससारख्या जागेची गरज नसेल किंवा कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नसेल परंतु मैत्रीबाबत मात्र तुम्ही जरूर विचार करा. तुम्हाला जाणवेल की मित्रांशिवाय आपण खूप एकाकी पडू. जेव्हा आपण मित्र जोडतो, तेव्हा आपण खूप काही करू शकतो. आपण नवनवीन गोष्टी शिकू शकतो, एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करू शकतो. आपण अजून अजून प्रगल्भ होऊ शकतो.

तुम्हाला नक्की जाणवेल की दुसऱ्याशी मैत्री करणं किती आवश्यक आहे आणि दुसऱ्याच्या मैत्रीचा स्वीकार करणंही.

अगदी आपली मैत्रीण जेन ॲडम्स सारखंच!





महत्वाच्या घटना

जेन ॲडम्स

(1860 – 1935)

जेन ॲडम्सचा जन्म ६ सप्टेंबर १८६० ला इलिनॉयमधील सीडरविल शहरात झाला. जेन एका श्रीमंत गिरणी मालक जॉन ॲडम्स ह्यांच्या पाच अपत्यामधली सगळ्यात धाकटी होती. जॉन ॲडम्स आपल्या राज्याचे सिनेटर होते तसेच त्यांची स्वतःची वित्तीय संस्था होती.

जेनच्या लहानपणीच तिची आई वारली. ह्या संवेदनशील मुलीला तिच्या मोठ्या भावंडानी खूप प्रेमाने वाढवलं. कमरेचं एक हाड मोडल्याने तिची मान एका बाजूने तिरकी रहायची. त्यामुळे तिला आपण दिसायला चांगले नाही ह्याचं फार वाईट वाटे.

जेन सात वर्षाची असताना तिला आपल्या सभोवतालच्या परिसरात खूप गरिबी आहे हे जाणवलं. सीडरविलजवळच्या एका छोट्या शहरामध्ये जेव्हा तिने उघडी-नागडी मुलं आणि बकाल घरं पाहिली तेव्हाचा तिने निश्चय केला की अशा वस्तीमध्ये ह्या सर्व गरीब मुलांना खेळता येईल असं मोठं घर बांधायचं.

जेनच्या बाबांनी एना हैडलमैन नावाच्या विधवेशी दुसरं लग्न केलं तेव्हा जेन आठ वर्षाची होती. तिच्या ह्या दुसऱ्या आईला दोन मुलगे होते, १८ वर्षाचा हरी आणि जेनपेक्षा ६ महिने लहान असलेला जॉर्ज. जॉर्ज खूप उत्साही आणि शूर मुलगा होता. त्याने जेनला तिच्या कोशातून बाहेर पडायला खूप मदत केली.

१८८१ मध्ये जेनने रॉकफोर्ड, इलिनॉयमधील रॉकलैंड महिला विद्यालयामध्ये आपले शिक्षण पूर्ण केले. त्या विद्यालयातील बहुतांश मुलींना एकच प्रमाणपत्र दिलं जायचं पण जेनने एक वर्ष अधिक अभ्यास केला आणि पदवी हातात घेतली. वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी तिने फिलाडेल्फिया महिला कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

परंतु डॉक्टर होण्याची जेनची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. फिलाडेल्फियामध्ये शिकत असताना पहिल्याच वर्षी कमरेच्या दुखण्याने डोकं वर काढलं त्यामुळे ताबडतोब ऑपरेशन करावं लागलं. ऑपरेशननंतर तब्बेत सुधारावी म्हणून ती युरोपमध्ये गेली. तिथल्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या गरिबांचे हाल पाहून तिला आपला लहानपणीचा निश्चय आठवला.

नंतर आपली रॉकफोर्डमधील मैत्रीण एलेन स्टारला सोबत घेऊन ती पुन्हा एकदा युरोपला गेली. त्यावेळी लंडनमध्ये टॉय अँड बी हॉल नावाचे "सेटलमेंट हाउस" बघितलं. तिकडे शिकलेले लोक येऊन राहत आणि गरीब शेजाऱ्यांना मदत करीत. ते पाहून ती खूप प्रभावीत झाली. नंतर त्या दोघी अमेरिकेला परत आल्या.



परत आल्यावर शिकागोच्या झोपडपट्ट्यांमध्ये योग्य जागेचा शोध घेतला आणि ३३४ साउथ हाल्सटेड स्ट्रीट वरील पडक्या अवस्थेतील हल मेन्शन त्यांच्या नजरेस पडलं. त्यांनी निश्चय केला की सेटलमेंट हाउससाठी हे सुयोग्य स्थान आहे. आणि त्यांनी ही जागा भाड्याने घेतली. घराची साफसफाई, रंगरंगोटी केली, फर्निचर आणलं आणि दोघीजणी त्या गरीब वस्तीतील लोकांच्या शेजारी म्हणून राहायला आल्या.

लवकरच जेन आणि एलेन वस्तीतील कामाला जाणाऱ्या महिलांची मुलं हल हाउसमध्ये सांभाळू लागल्या. नंतर आपल्या मित्रमंडळीच्या मदतीने तिथल्या मुलांसाठी शिवणकाम आणि स्वयपाक शिकवण्याचे वर्ग सुरु केले. मोठी मुलं तिकडे खेळायला येऊ लागली आणि वयस्कर माणसंही चहाच्या निमित्ताने हास्य-विनोद करायला जमू लागले.

जेनला वस्तीच्या अजून काही गरजा आहेत ज्या सेटलमेंट हाउस पूर्ण नाही करू शकत हेही लवकरच लक्षात आलं. काही कारखान्यांमध्ये लहान मुलांना राबवलं जायचं. जेनने त्यासाठी बालकामगार विरोधी कायदा व्हावा ह्यासाठी खूप संघर्ष केला. कारखान्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेसाठी कायदा करावा ह्यासाठी सरकारला विनंती केली. प्रौढ-शिक्षण, लहान मुलांसाठी बालवाड्या, स्वस्त घर योजना, महिलांना मतदानाचा अधिकार अशा विविध कामासाठी लढा दिला. तिची लोकप्रियता आणि ख्याती दूरवर पसरली. येल विश्वविद्यालयाने मानद डिग्री देऊन सत्कार केलेली ती पहिली स्त्री होती. राष्ट्रपती रूज़वेल्टनी तिचा “"अमेरिकेची सर्वात सदुपयोगी नागरिक" अशा शब्दात गौरव केला.

१९३१ मध्ये जेनला शांतीचे नोबेल पारितोषक मिळाले. वयाच्या ७५ वर्षापर्यंत ती हल हाउसमध्ये हॉल्स्टेड स्ट्रीटमधील आपल्या मित्रांची शेजारी म्हणून राहिली. २१ मे १९३५ ला तिचा मृत्यू झाला.

समाप्त